फोन नं. ०२२-६९१६२३००
romumbai@dtemaharashtra.gov.in
www.jdteromumbai.org.in

महाराष्ट्र शासन

**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई**

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.

क्र. ४/विकामुं/तांशा/शिष्यवृत्ती/२०२४/E-office cir. दिनांक : ११/०९/२०२४

**तात्काळ**

# परिपत्रक

विषय : ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा सर्व मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये १००% सवलतीबाबत. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शा.नि.क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८/०७/२०२४
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शा.परि.क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४, दि.१९/०७/२०२४
३. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३११, दि. २३/०७/२०२४
४. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ४/विकामुं/तांशा/शिष्यवृत्ती/२०२४/२६५६, दि. २९/०७/२०२४
५. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३४६, दि. १२/०८/२०२४
६. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३५७, दि. २२/०८/२०२४
७. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/३६८, दि.०९/०९/२०२४

सर्व पदविका संस्था, व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांनी सोबत जोडलेले मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्या संदर्भीय क्र.७च्या परिपत्रकाचे अवलोकन करावे.

उपरोक्त विषयांकीत संदर्भीय १चा शासन निर्णयान्वये, राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानीत अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानीत (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानीत महाविद्यालये/तंत्रनिकेतने/सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे/स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमास शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्याक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC), व इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जांचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागाकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभाऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शेक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने,

- संदर्भ क्र.२च्या शासन परिपत्रकान्वये व संदर्भ क्र. ३च्या तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्रान्वये तसेच या कार्यालयाचे संदर्भीय क्र.४च्या परिपत्रकान्वये शैक्षणिक संस्थांनी अशा योजनेसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थीनींकडून प्रवेशावेळी शैक्षणिक शुल्क घेण्यात येऊ नये याबाबत कळविले होते.
- संदर्भ क्र. ६च्या तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्रान्वये संस्थांनी उपरोक्त योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून देऊन, डीबीटी पोर्टलवर संस्थेत शिकत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना संबंधीत योजनेसाठीचा परिपूर्ण अर्ज ऑक्टोबरपूर्वी भरण्याबाबत कळविण्यात आले होते. जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही. अशी सूचना देण्यात आली होती.

...२.

तरीदेखील डीबीटी पोर्टलवर कमी अर्ज प्राप्त होत असल्याकारणाने सर्व संबंधीत संस्थांना कळविण्यांत येते की, संस्थांनी खालील सूचनांप्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी.

१. संस्थांनी त्यांच्या संस्थेतील ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा सर्व मुलींना (EBC/EWS/SEBC/OBC) उपरोक्त शासन निर्णय क्र.१ अन्वये शासनाकडून दिल्या जाणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १००% सवलतीबाबत अवगत करावे.

२. संस्थांनी प्रवेशावेळी घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण (Orientation Programme) कार्यक्रमाच्या वेळी योजनेच्या लाभाबाबतची माहिती देण्यात यावी.

३. संस्थांनी, सदर शिष्यवृत्ती योजनेकरिता विद्यार्थीनींकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज करतेवेळी येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी संस्थेतील वरिष्ठ प्राध्यापकांची नियुक्ती करावी.

४. संस्थांनी पात्र विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त अर्ज (नवीन/नुतनीकरण) प्राप्त होण्यासाठी दि. १७/०९/२०२४ ते दि. १९/०९/२०२४ या कालावधीमध्ये संस्था स्तरावर **"विशेष मोहिम"** राबवून, पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेण्यात यावे.

५. तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाची, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येत असलेली **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनांतर्गत** लाभाचा पहिला हप्ता देण्यासाठी पुरेसा निधी अर्थसंकल्पित आहे. सदर योजनेचा पहिला हप्ता संस्थांना ऑक्टोबरमध्ये प्राप्त होण्यासाठी संस्थांनी संस्थेत शिकणाऱ्या उपरोक्त योजनेंतर्गत डीबीटी पोर्टलवर पात्र विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त अर्ज (नवीन/नुतनीकरण) भरुन तपासणी (मंजूर/नामंजूर) करुन डीबीटी पोर्टलवर पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे.

तरी सर्व संबंधीत संस्थांना कळविण्यात येते की, वरील सुचनांचे काटेकोर पालन करुन संस्था स्तरावरील सर्व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज तातडीने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावेत. जेणेकरुन शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही.

Signed by
Pramod A Naik
Date: 11-09-2024 14:32:38

सहपत्रे : वरीलप्रमाणे

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रति,
संचालक/कुलसचिव/प्राचार्य,
सर्व संबंधित शासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था

प्रत माहितीसाठी : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

F/c

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६

ई-मेल § desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**तात्काळ : स्पीडपोस्ट /ई-मेलद्वारे** क्र.:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/३६८

परिपत्रक दिनांक :- ०९ / ०९ / २०२४

**विषय : ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा सर्व मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क मध्ये १०० टक्के सवलती बाबत....**

संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७/१०/२०१७.

२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८/०७/२०२४.

३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४, दि.१९/०७/२०२४.

४. संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३११ दि.२३/०७/२०२४

५. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३४६ दि: -१२/०८ /२०२४

६.संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३५६ दि: -२२/०८ /२०२४

७. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३५७ दि: -२२/०८ /२०२४

उपरोक्त संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयान्वये, राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या **आर्थिकदृष्टया मागास (EBC), आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (SEBC) व इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील** नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) **मुलींना** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.**

**त्या अनुषंगाने,**

- संदर्भ क्र.३ च्या शासन परिपत्रकान्वये व संदर्भ क्र. ४ च्या तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्रान्वये शैक्षणिक संस्थांनी अशा योजनेसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थीनींकडून प्रवेशावेळी शैक्षणिक शुल्क घेण्यात येऊ नये याबाबत कळविले होते.

- संदर्भ क्र. ७ च्या तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्रान्वये संस्थांनी उपरोक्त योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती

निदर्शनास आणून देऊन, डीबीटी पोर्टलवर संस्थेत शिकत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना संबंधित योजनेसाठीचा परिपूर्ण अर्ज, **ऑक्टोबरपूर्वी** भरण्याबाबत कळविण्यात यावे. जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही अशीदेखील सूचना देण्यात आली होती.

तरीदेखील डीबीटी पोर्टलवर कमी अर्ज प्राप्त होत असल्याकारणाने,सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना, खालीलप्रमाणे पुन:श्च सूचना देण्यात यावी.

१. संस्थांनी त्यांच्या संस्थेतील **ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा सर्व मुलींना** ( EBC/ EWS/ SEBC/ OBC ) उपरोक्त शासन निर्णय क्र. २ अन्वये शासनाकडून दिल्या जाणाऱ्या **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलती बाबत** अवगत करावे.

२. संस्थांनी प्रवेशावेळी घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण **(Orientation Programme)** कार्यक्रमाच्या वेळी योजनेच्या लाभाबाबतची माहिती देण्यात यावी.

३. संस्थांनी, संस्थेतील वरीष्ठ प्राध्यापकांची सदर शिष्यवृत्ती योजनेकरिता विद्यार्थीनींकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज करतेवेळी येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणेसाठी नियुक्ती करावी.

४. संस्थांनी पात्र विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त अर्ज (नवीन /नुतनीकरण) प्राप्त होण्यासाठी **दि.१७/०९/२०२४ ते दि.१९/०९/२०२४ या कालावधीमध्ये** संस्थास्तरांवर **विशेष मोहिम राबवून,** पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेण्यात यावे.

५. तसेच, विभागीय कार्यालयांनी, उच्च व तंत्रशिक्षण विभागाची, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येत असलेली, **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनांतर्गत** लाभाचा पहिला हप्ता देण्यासाठी पुरेसा निधी अर्थसंकल्पित आहे. सदर योजनेचा लाभाचा पहिला हप्ता संस्थांना ऑक्टोबरमध्ये प्राप्त होण्यासाठी संस्थांनी संस्थेत शिकणाऱ्या उपरोक्त योजनेंतर्गत डीबीटी पोर्टलवर पात्र विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त अर्ज ( नवीन /नुतनीकरण ) भरुन संस्थांनी तपासणी ( मंजूर /नामंजूर ) करुन डीबीटी पोर्टलवर पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे असेही सर्व संस्थांना कळवावे.

तसेच, विभागीय कार्यालयांना असेही निर्देश देण्यात येते की, आपल्या विभागांतर्गत येणाऱ्या सर्व संस्था सदर योजनेची माहिती व प्रसिध्दी लाभार्थी विद्यार्थीनींपर्यंत पोहोचवित आहेत याची खात्री करावी व त्याप्रमाणे उपाययोजना करुन सदर योजनेची माहिती लाभार्थी पर्यंत पोहोचेल याबाबतची कार्यवाही करावी व डीबीटी पोर्टलवर सर्व पात्र विद्यार्थीनींकडून जास्तीत जास्त अर्ज भरले जातील याबाबत वेळोवेळी अर्जांचा आढावा घेऊन त्याप्रमाणे अहवाल संचालनालयास प्रत्येक आठवडयाच्या सुरवातीस **desk18@dtemaharashtra.gov.in** या ईमेलवर पाठवावा.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत- १. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर. यांना माहिती व त्यांच्या अधिनस्त व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व संस्थांना दिलेल्या सर्व सूचनांचे पालन काटेकोररित्या करण्यासाठी सूचित करण्याकरिता.

२. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सादर.